“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। क्षमा शूरस्य भूषणम् ।।

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ३६ ऑक्टोबर-डिसेंबर २०१४

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी

# वार्षिक स्नेहसंमेलन - २०१४

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

**प्रमुख पाहुणे** : डॉ. सुहास पांडुरंग वाघ (ई. एन्. टी. तज्ज्ञ)

**स्थळ** : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर.

**दिनांक** : रविवार २३ नोव्हेंबर २०१४, सायं. ४.१५ वाजता

## कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- विशेष सत्कार (तपशील पृ. ४ वर)

  **एज्यु. सोसायटी तर्फे :** श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी

  **संघातर्फे :** डॉ. संगीता हेमंत पिकळे

- मध्यंतर
- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना डॉ. माया वाघ यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.
याची कृपया नोंद घ्यावी.

**प्रेमानंद शं. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष - संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष - एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## आगामी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे

२३ नोव्हेंबर होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनाची निमंत्रण पत्रिका समोरील पृष्ठावर छापलेलीच आहे. या संमेलनाचे प्रमुख पाहुणे आहेत माहीम येथे राहणारे डॉ. सुहास पांडुरंग वाघ, मुंबईतील निष्णात ई. एन्. टी. डॉक्टर्सपैकी एक. त्यांची ही अल्पशी ओळख.

डॉ. वाघ यांचे शालेय शिक्षण बालमोहन विद्यामंदीर येथे झाले व महाविद्यालयीन शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेज येथून झाले. के.ई. एम्. हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या जी. एस. मेडीकल कॉलेजमधून ते एम्.बी.बी.एस. झाले व नंतर तेथूनच ते एम्.एस्. (इएन्टी) या पदव्युत्तर परीक्षेंत उत्तीर्ण झाले. तेथील इएन्टी विभागांत त्यांनी ऑनररी प्रोफेसर म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याशिवाय कुपर हॉस्पिटलमध्ये त्याच विषयाचे ऑनररी विभाग प्रमुख म्हणून त्यांनी २३ वर्षे सेवा केली. कन्सल्टींग इएन्टी सर्जन म्हणून १९७२ पासून ते प्रॅक्टीस करतात.

वैद्यकीय नैपुण्याशिवाय ते तरुणपणी उत्तम क्रिकेटपटुही होते. जी. एस्. मेडीकल कॉलेजच्या टीमचे ते ऑलराऊंडर होते, आघाडीचे फलंदाज व ऑफस्पिनर. इंटर मेडीकल कॉलेजच्या अखिल भारतीय स्तरावरच्या स्पर्धेंत त्यांच्या संघाला सलग दोन वर्षे अजिंक्यपद मिळाले होते. टाईम्स ऑफ इंडिया, तालीम शील्ड सारख्या स्थानिक प्रतिष्ठेच्या स्पर्धांमध्येही त्यांनी भाग घेतलेला आहे.

डॉ. वाघ यांचे कुटुंब वैद्यकीय क्षेत्राशीच निगडीत आहे. पत्नी डॉ. माया वाघ या ॲनेस्थेटीस्ट म्हणून प्रॅक्टीस करीत असत. डॉ. वाघ यांचे चिरंजीव डॉ. मिहीर वाघ हे सुध्दा केईएम्चे एम्बीबीएस आहेत. अंतिम परीक्षेत इएन्टी व ऑप्थॅल्मॉलॉजी या दोन विषयांत त्यांना मुंबई विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळाले होते. नंतर अमेरिकेत जाऊन त्यांनी एम्डी केले आणि हार्वर्ड विद्यापीठातून एण्डोस्कोपिक सर्जरी या अतिविशेष क्षेत्रांत उच्च शिक्षण घेतले. डॉ. मिहीर वाघ हे सध्या युनिव्हर्सिटी ऑफ फ्लॉरिडा येथे गॅस्ट्रॉ एन्टेरॉलॉजी या विभागांत कन्सल्टंट म्हणून काम करतात व अध्यापनही करतात.

डॉ. मिहीर वाघ यांच्या पत्नी डॉ. सुजाता वाघ यांनी सायन हॉस्पिटलमधून एम्बीबीएस ची परीक्षा उत्तीर्ण केल्यावर अमेरिकेत प्रयाण केले. तेथे त्या एम्.डी.ही परीक्षा उत्तीर्ण झाल्या. सध्या त्या फ्लॉरिडा येथे एण्डोक्रिनॉलाजिस्ट कन्सल्टंट म्हणून प्रॅक्टिस करतात.

आगामी स्नेहसमेलनांत डॉ. सुहास वाघ यांच्या
भाषणाचा सर्वांनी अवश्य आस्वाद घ्यावा.

१ ऑक्टोबर २०१४

द.ना.नाडकर्णी

## २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या स्नेहसंमेलनातील सत्कारमूर्तींचा त्रोटक परिचय

### श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी

संघातर्फे प्रसिध्द होणारी त्रैमासिक 'मुखपत्रिका' ज्याची अनेकजण आतुरतेने वाट पाहतात, त्याचे गेली ३६ वर्षे संपादन करणारे डी. एन्. ऊर्फ दत्तात्रय नाडकर्णी बहुतेकांच्या परिचयाचे आहेत. २६ जुलै रोजी भरलेल्या एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांना संस्थेचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करण्यात आले म्हणून त्यांचा सत्कार करण्यात येत आहे.

ज्ञातिसेवेमध्ये त्यांचे योगदान लक्षणीय आहे. एज्युकेशन सोसायटी पुरते नमूद करावयाचे म्हणजे पूर्वी ज्ञातिबांधवांशी संपर्क असावा म्हणून सोसायटीतर्फे घरोघरी जाऊन दिवाळी वर्गणी गोळा केली जात असे. १९७२ ते १९७९ या आठ वर्षाच्या कालावधीत त्यासाठी पार्ल्याच्या परिसरांतील झोपडीपासून अलिशान बंगल्यापर्यंत प्रतिवर्षी सुमारे शंभर घरे ते पिंजून काढत असत. केवळ पैसे गोळा करणे हे त्यांचे उद्दिष्ट नसायचे तर त्या सगळ्यांशी अगदी जवळून संपर्क साधण्याचा त्यांचा प्रयत्न असे. मुखपत्रिकेचा श्रीगणेशा करतांना त्यांना याच माहितीचा उपयोग झाला.

संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थाच्या सभासदांचे रजिस्टर्स जवळजवळ नसल्यासारखेच होते. त्यांनी एकहाती दोन्ही रजिस्टर्सना नवीन आकार देऊन ते परिपूर्ण केले.

मुखपत्रिका घरोघरी पोचत असल्याने प्रत्येकाला संघाचे व एज्युकेशन सोसायटीचे कार्य समजायला लागले आहे. त्यामुळे उभय संस्थांना मिळणाऱ्या देणग्यांचा ओघही वाढला आहे. एज्युकेशन सोसायटीला आता गरजू विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या साहाय्यात सतत वाढ करणे शक्य झाले आहे. याचे बरेचसे श्रेय डी. एन्. यांना द्यायला पाहिजे.

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे.**

### डॉ. संगीता हेमंत पिकळे

डॉ. संगीता पिकळे यांची अलीकडेच असोसिएशन ऑफ मेडिकल कन्सल्टंट्स या प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली त्यासाठी त्यांचा संघातर्फे सत्कार करण्यात येत आहे. डॉ. पिकळे यांच्या कार्याची माहिती मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात आलेलीच आहे.

# प्रकाशझोत

## 'आय्. एन्. एस्. कोलकता' नरेन्द्र मोदींच्या हस्ते राष्ट्राला अर्पण
## कॅबिन्सची अंतर्गत सजावट सौ. विभा नाडकर्णी यांची

पंतप्रधान श्री. नरेन्द्र मोदी यांनी अलीकडेच मुंबईच्या गोदींत 'आय्. एन्. एस्. कोलकता' ही संपूर्ण स्वदेशी बनावटीची सर्वांत मोठी युध्दनौका राष्ट्राला समर्पित केली. या युध्दनौकेची घडण मुंबईतच झाली होती. या प्रकल्पामध्ये आपल्यापैकी सौ. विभा शिवराम (प्रसाद) नाडकर्णी हिचे महत्वाचे योगदान होते हे ज्ञातीला अभिमानास्पद आहे.

या युध्दनौकेवर ॲडमिरल, कॉमोडोर सारख्या अत्युच्च पदावरील अधिकाऱ्यांकरिता सहा कॅबीन्स आहेत व सातवा प्रशस्त हॉल 'लाऊंज' च्या स्वरुपात आहे. या सर्व सातही कॅबीन्सची अंतर्गत सजावट विभाने केलेली आहे. Anchor off shore या कंपनीला हे कंत्राट मिळाले होते. कंपनीचे मालक नरोत्तम यांचे ऑफिस व निवासस्थान विभानेच सजविलेले असल्याने कंपनीचा विभावर गाढ विश्वास निर्माण झाला. त्यामुळे युध्दनौकेवरील सजावटीचे काम तिच्यावरच सोपविले गेले. विभा वर्षभर या प्रकल्पावर कार्यरत होती. मर्यादित उपलब्ध जागेंत जास्तीत जास्त सुविधा पुरविणे, आकर्षक व सौम्य रंगकाम, टिकाऊ वस्तूंचा खुबीने उपयोग यामुळे सर्व वरीष्ठ अधिकाऱ्यांनी विभाचे कौतुक केले. समर्पणाच्या सोहळ्यात अतिमहत्त्वाच्या व मोजक्या निमंत्रितांमध्ये विभाचाही समावेश होता.

विभा ही प्रसिध्द नेत्रतज्ज्ञ डॉ. शिवराम नाडकर्णी यांची पत्नी व सायन हॉस्पिटलचे निवृत्त डीन डॉ. सदानंद नाडकर्णी व सौ. सुहासिनी यांची स्नुषा होय.

## अमोल शेटगिरी M. Arch. परीक्षेंत सर्वप्रथम

दिवंगत प्रसिध्द आर्किटेक्ट श्री. प्रकाश शेटगिरी व डॉ. नंदिता शेटगिरी यांचा सुपुत्र अमोल याने यंदा मुंबई विद्यापीठाच्या M. Arch. या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. सध्या तो वडिलांचा स्ट्रक्चरल इंजिनियरींग व आर्किटेक्ट हा व्यवसाय सांभाळत आहे.

## अनिकेत वागळे - कारवारी कुमार स्टीफन हॉकिंग

जगप्रसिध्द खगोलभौतिक विचारवंत स्टीफन हॉकिंग संपूर्णपणे अपंग व परावलंबी आहे हे सर्वश्रुत आहे. केवळ दुर्दम्य इच्छाशक्तीने त्याने आपल्या व्यंगावर मात करुन अत्यंत गहन विषयावर जागतिक पातळीवरचे संशोधन चालूच ठेवलेले आहे.

अंधेरी येथे राहणारे श्री. मोहन शांताराम वागळे यांचा अठरा वर्षाचा नातू अनिकेत धीरेन वागळे याला जन्माच्या दुसऱ्या दिवशीच कावीळ झाली. वर्षभरातच डॉक्टरनी Cerebral Palsy म्हणून निदान केले. त्यामुळे त्याच्या बोलण्याचालण्यावर परिणाम झाला. त्याच्यावर फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, योग असे वेगवेगळे इलाज करण्यात येत आहेत. अशा

कठीण परिस्थितीत देखील न कंटाळता, नाऊमेद न होता, तो मन लाऊन अभ्यास करीत आहे. तो दहावी उत्तम रीतीने उत्तीर्ण झाला आता बारावीत (कलाशाखा) त्याला ६८ टक्के गुण मिळाले आहेत. सध्या त्याने भवन्स कॉलेज, अंधेरी येथे बी. अे. साठी प्रवेश घेतला आहे.

**आनंदजी दोसा व हिंदूंचे सलामीचे फलंदाज विश्वनाथ कंटक**

भारतीय क्रिकेटचा चालताबोलता ज्ञानकोश असे ज्यांना म्हणतात ते आनंदजी दोसा यांचे अलीकडेच निधन झाले तेव्हां वृत्तपत्रांतून त्यांच्याविषयी अनेक लेख छापून आले होते. आनंदजी दोसा व क्रिकेट आकडेवारी हे एक समीकरणच होते. क्रिकेटच्या सांख्यिकी तज्ज्ञांचे ते खलीफा होते त्यांच्याविषयी एक हृद्य आठवण.

१९८५ साली आपल्या संघाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रसिध्द झालेल्या स्मरणिकेत मला ज्ञातींतील 'ऐतिहासिक व्यक्ती' हा लेख लिहायचा होता. अशा व्यक्तींमध्ये अंत्रवल्ली गांवचे संतकवी श्री. नाईक स्वामी, 'श्री मांगीश माहात्म्य' कर्ते शुभानंद पिकळे, विद्यावाचस्पती मंगेश राव तेलंग, वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी त्यांच्याशिवाय मला माझ्या लेखांत हिंदूंचे सलामीचे फलंदाज विश्वनाथ वामन कंटक यांचाही समावेश करावयाचा होता. शंभर वर्षापूर्वी, प्रथम श्रेणीच्या क्रिकेट सामन्यांत भाग घेणारे ते पहिले कारवारी होते. या संदर्भात विशेष माहिती गोळा करण्यासाठी मी विजय मर्चंट यांना त्यांच्या फोर्टमधील कार्यालयांत भेटलो. त्यांनी मला आनंदजी दोसा यांना भेटायला सांगितले व त्यांचा पत्ता, फोन नंबर, व चिठ्ठीही दिली. त्यानुसार मी सांताक्रुजला लिंकींग रोड येथील त्यांच्या निवासस्थानी गेलो. त्यांनी माझे अत्यंत आपुलकीने स्वागत केले. माझे उद्दिष्ट सांगितल्यावर त्यांनी त्यांच्या अफाट संग्रहातून क्षणार्धात एक बाड बाहेर काढले व त्यांनी मला १९१६ ते १९२० या कालावधीतील चौरंगी सामन्यांतील कंटक यांच्या त्यांनी खेळलेल्या सर्व सामन्यांची तपशीलवार आकडेवारी दिली. त्याशिवाय त्यांनी मला एक नावाजलेले क्रिकेटपटु पी. विठ्ठल यांच्या 'माझे क्रीडाजीवन' या पुस्तकांतून त्यांनी कंटकविषयी लिहिलेला एक उताराही वाचून दाखविला.

कंटक यांची खेळण्याची पोज असलेली एक तसबीर चौपाटीवरील हिंदू जिमखान्यांत होती. पण १९६३ सालच्या आगीत ती भस्मसात झाली. कंटक यांचे ९.८.१९२१ रोजी ऐन तारुण्यांत विषमज्वरांने मुंबई येथे निधन झाले.

**द. ना. नाडकर्णी, पारले. (२६१२४१६२)**

# ठाणे मंचचा कार्यक्रम

## 'आमगेलेच डॉक्टर्स आमगेल्याच वासपुशीक'

२१ सप्टेंबर रोजी ठाणे येथील सरस्वती क्रीडा संकुल येथे झालेला 'आमगेलेच डॉक्टर्स आमगेल्याच वासपुशीक' हा कार्यक्रम म्हणजे नावाप्रमाणेच एक कौटुंबिक घरगुती समारंभासारखाच होता. ऑर्थोपेडीक सर्जन डॉ. श्रीधर कुलकर्णी, ई. एन्.टी सर्जन डॉ. नंदिता पालेकर, डेन्टल सर्जन डॉ. सिध्दार्थ वागळे हे मान्यवर डॉक्टर्स उपस्थित होते.

सर्वप्रथम आपले ज्येष्ठ नागरीक श्री. सदानंद देसाई यांनी कुलदैवतांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन केले व सर्व डॉक्टरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यांच्या पत्नी सौ. अपर्णा देसाई यांनी ठाणे मंचला रु. ५००० देणगी दिली. मंजिरी कुलकर्णी यांनी सर्व डॉक्टर्स व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. श्रीधर कुलकर्णी यांची थोडक्यात ओळख करुन दिली. डॉ. श्रीधर कुलकर्णी गेली ३० वर्षे ऑर्थोपेडीक सर्जन म्हणून कार्यरत असुन ते मोतीबेन दळवी, कॉनवेस्ट जैन क्लिनिक तसेच कंबाला हिल्स या हॉस्पिटलशी संलग्न आहेत. त्याचबरोबर आपल्या संघातर्फे व लायन्स क्लब तर्फे त्यांनी अनेक आरोग्य शिबिरे भरवली आहेत. या प्रास्ताविकानंतर मंजिरी यांनी कार्यक्रमाची सर्व सूत्रे डॉ. कुलकर्णीकडे सुपुर्द केली.

प्रथम डॉ. कुलकर्णी यांनी ई. एन्.टी. स्पेशालीस्ट डॉ. नंदिता पालेकर यांची ओळख करुन दिली. डॉ. नंदिता या ठाण्याच्या Bethany हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत. 'काना' बद्दल त्यांनी अतिशय सोप्या शब्दात सुसंगतपणे छान माहिती सांगितली. कानाचे सर्वात मुख्य काम म्हणजे शरीराचे संतुलन राखणे. कानाचे अंतर, मध्य, बाह्य असे तीन भाग असून अंतर्भागातल्या Wax glands महत्वाच्या असतात. कधी कधी काय करावे यापेक्षा काय करु नये या सूचना जास्त महत्वाच्या असतात. कानात पाणी किंवा तेल किंवा Hydrogen Peroxide घालू नये fungus होतो. buds आतल्या कानापर्यंत घालु नये. लहान मुले शेंगदाणे, वाटाणे, बटण, सारख्या गोष्टी कानात घालतात त्या तज्ज्ञ डॉक्टर्स कडुनच काढाव्यात. तसेच काही मोठी माणसेही कमी नसतात, काय पण कानात घालतात. अशावेळी self medication टाळावे. डायाबेटीक लोकांनी कानाची विशेष काळजी घ्यावी. mobile चा अतिवापर टाळावा. कान किती कारणानी दुखतो व त्यावर उपचार कसे घ्यावेत ह्याची डॉ. नंदितानी स्लाइडस् द्वारे खूप छान माहिती सांगितली व श्रोत्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

त्यानंतर डॉ. श्रीधर कुलकर्णी यांनी डॉ. नंदिताच्या व्याख्यानातील सार सांगितले व डेंटल सर्जन डॉ. सिध्दार्थ वागळे यांची थोडक्यात ओळख करुन दिली. डॉ. वागळे हे Consulting Dental Surgeon असून त्यांचे ठाण्यात स्वत:चे क्लिनिक आहे. शिवाय

ठाणे-मुलुंड येथे Reconstructive Dentistry ची Multi speciality practice करत आहेत. रेड क्रॉस सारख्या अनेक समाजसेवी संस्थांशी ते संलग्न आहेत.

डॉ. वागळे यांनी अगदी हसत खेळत स्लाइडद्वारे दातांबद्दल खूप माहिती सांगितली. अगदी Baby teeth (दुधाचे दात) पासून कवळी पर्यंत दाताची दुखणी व उपचार त्यांनी सांगितले. दाताच्या रंगाशी दात Normal किंवा healthy असण्याचा काहीही संबंध नसतो. तसाच Wisdom tooth शी ही अकलेचा काहीही संबंध नसतो. त्यामुळे माणसात होणाऱ्या उत्क्रांतीत काही पिढयानंतर २८ च दात असतील तरी अक्कल जाण्याची भिती नाही. हल्लीच्या अद्यावत तंत्रज्ञानाचे अनेक फायदे त्यांनी सांगितले. हल्ली दात काढणे सर्व डेंटीस्टस् टाळतातच शिवाय दात अर्धा तुटला तरी काढुन न टाकता आधुनिक पध्दतीने रोपण करुन तो वाचविता येतो. पूर्वी दातात चांदी भरली जायची ही पध्दत चुकीची असुन जगभर त्यावर बंदी असल्याचे त्यांनी सांगितले. लवंगाचाही अति वापर टाळावा. बऱ्याच वेळी कानामध्ये दुखत असलेतरी दोष दातात असु शकतो व जबडा दातामुळे दुखतोय असे वाटले तरी कानामुळे दुखु शकतो हे त्यांनी सोदाहरण सांगितले. टुथपेस्ट पेक्षा टुथ ब्रश महत्वाचा व तो ही Ultra soft ब्रश वापरावा. हल्लीतर battery operated brush ने योग्य त्या प्रेशरने दात साफ ठेवता येतात असे ही त्यांनी सांगितले. हल्ली कवळी fibreglass ची बनवली जाते. व कवळीचे माप घेतानाही सर्व दात काढण्याची गरज नसते त्यामुळे सर्व दात काढल्या काढल्याच कवळी वापरता येते. mouth-wash चा ही अतिवापर टाळावा कारण त्याने दाताचे Enamel जायची भिती असते. हिरडयांचे आरोग्य चांगले असणे खुप महत्वाचे असल्याचे ते म्हणाले श्रोत्यांनीही त्यांना अनेक प्रश्न विचारले व त्यांनीही न कंटाळता उत्तरे दिली.

डॉ. श्रीधर कुलकर्णी यांनी डॉ. सिध्दार्थ वागळे यांच्या व्याख्यानाचे सार सांगितले व दरवर्षी वेगवेगळया स्पेशालिस्ट डॉक्टर्सना बोलावून हा नेक उपक्रम चालु ठेवावा अशी सूचना केली व कार्यक्रमाची सांगता केली.

एस. के. देसाईनी ठाणेमंच तर्फे तिन्ही डॉक्टर्सना छोट्याशा स्मरण भेटी दिल्या.

श्री. किरण दिवेकर यांनी आभाराचे भाषण केले. आलुपराठे, दुधी हलवा, कोथिंबीर वडी, दही, लोणचे असा चविष्ट पोटभर नाश्ता करुन सर्व संतुष्ट झाले, व्याख्याने ऐकून कानही तृप्त झाल्याने सर्वांच्याच चेहऱ्यावर स्मितहास्य होते.

**मंजिरी कुलकर्णी, ठाणे.**

# महिला मंडळ, कारवार - अमृत महोत्सव

आजकाल शहर गांव म्हटलं की तेथे सामाजिक कार्यासाठी अनेक संघ संस्थांचे पेंवच फुटलेले असते हे आपण पाहतो. त्यातील काही तग धरतात तर काहींनी केव्हांच गाशा गुंडाळलेला असतो. परंतु कारवार मध्ये स्वातंत्र्य पूर्व काळात म्हणजे दि. १.२.१९३९ रोजी कांही प्रतिष्ठित स्त्रियांनी एकत्र येऊन महिला मंडळ या संस्थेची स्थापना केली ती आता ७५ वर्षानंतरही टिकून आहे. संस्था सुरु करतांना गरीब वर्गातील स्त्रिया व मुलांच्या उन्नतीचे ध्येय व उद्दिष्ट समोर ठेवले होते. विशेषत: समाजातील मागास वर्गातील स्त्रिया व मुलांचा विकास साधण्यासाठी मंडळाच्या सभासदांनी स्वयंस्फूर्तीनें आत्मीयतेने झटावे ही त्यामागील त्यांची भूमिका होती. ती त्यांनी जोपासली. ह्या मंडळाच्या स्थापनेत पुढील स्त्रियांचा सिंहाचा वाटा होता अध्यक्ष : शांता गंगोळी, उपाध्यक्ष : श्रीमती कोयलो, कार्यवाह : उषादेवी (पदुताई) मुझुमदार व राधाबाई नागरकट्टी, खजिनदार : इंदिराबाई बोरकर, सभासद : अहिल्याबाई वाघ, राधाबाई वाघ, वासंती कसबेकर, राधाबाई नाडकर्णी. त्यांनी रोवलेले हे रोपटे नंतर स्वातंत्र्योत्तर काळांत वृक्षांत रुपांतर झालेले पाहून वरील सर्वांच्या आत्म्यांस निश्चित शांती लाभून असावी.

सुरुवातीच्या काळात त्यांच्या सभा "वामनाश्रम" मध्ये भरत असत. त्यानंतर सुहासिनी नरहरी बोरकर ह्यांच्या घरी सभा भरे. हळूहळू सभासद संख्या १०० वर पोहोचली (आजही तेवढीच आहे) त्यामुळे त्यांना आपली स्वत:ची वास्तू असावी असे वाटू लागले व लगेच त्यादृष्टीनें सर्व कामांस लागले त्यांच्या प्रयत्नांना यश आले व आता जेथे त्यांची इमारत उभी आहे ती जागा नाममात्र शुल्क भरुन १९५० मध्ये त्यांच्या नांवे झाली. नंतर १९५२ मध्ये मुंबई इलाख्यातील महिला कल्याण व बालविकास मंत्री इंदुमती शेठ ह्यांच्या हस्ते पायाभरणी समारंभ पार पडला व दोन वर्षात आताची ही इमारत उभी राहिली.

ह्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक निधी जमविण्यासाठी सर्व सभासदांनी खूप मेहनत घेतली. सर्वांना आदर्श वाटावा असे श्रम केले. सर्वांनी मिळून मिसळून आपुलकीनें व आत्मीयतेने अनेक प्रकारे निधी जमविण्यासाठी एकजूटीने कार्य केले. त्यासाठीं त्यांनी वस्तू प्रदर्शन व विक्री, खाद्यपदार्थ विक्री, बाहुल्या बनवून विक्री एवढेच नव्हे तर "एक होता म्हातारा" हे नाटक बसवून निधी गोळा केला. त्यावेळी सर्वानीं त्या नाटकाची वाहवा केली. शिरीन टॉकीजच्या समोरील इमारतीत पहिल्या मजल्यावर औद्योगिक महिला मंडळ ही शाखा स्थापून विविध पदार्थ विक्री करीत. पुढे स्वत:ची इमारत झाल्यावर ह्या मंडळातर्फे शिवण वर्ग सुरु केला. तेथे मुलींना व महिलांना शिवणकाम शिकवून त्यांना कर्नाटक सरकारच्या डिप्लोमा परीक्षेस बसविण्यात येत असे. त्यासाठी ५-६ शिवणयंत्रे खरेदी करण्यात आली.

शारदा गंगोळी, कृष्णाबाई कैसरे, श्रीमती बैंदूर त्यांचे योगदान खूप आहे. 'सेवा सदन' ही शाखा स्थापून त्यामार्फत बालवाडी चालू आहे. शिवाय मंडळात नृत्याचा वर्ग शनिवार-रविवार चालतो.

सामाजिक बांधीलकी म्हणूनहि ह्या मंडळाने केलेले कार्य वाखाणण्यासारखे आहे. गोवा मुक्ती संग्राम च्या वेळी सत्याग्रहींना झुणका - भाकर पुरविण्याचे व्रतच त्यांनी अंगिकारले होते. कोठेहि पावसाळ्यात पुरामुळे हानी झाली असेल तर पूरनिधी जमवून हे मंडळ आपला खारीचा वाटा उचलत असे. कारगिल युध्द व अन्य युध्द समयीं निधी गोळा करुन सैनिकांस साहाय्य केले जाते. भूकंपग्रस्त भागासाठी कपडे खाद्यपदार्थ पाठवून आपले कर्तव्य पार पाडण्यात हे महिला मंडळ नेहमीच अग्रेसर राहिले आहे.

मंडळांत आजही प्रतिवर्षी प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्यदिन, गांधी जयंती, हळदी कुंकू समारंभ, मकर संक्रांत, कोजागिरी पौर्णिमा, सरस्वती पूजन, वार्षिक सहल असे कार्यक्रम होतात. तसेच रांगोळी स्पर्धा, ,खाद्यपदार्थ स्पर्धा, फुलांच्या पाकळयांची आरती सजावट स्पर्धा अशा अनेक स्पर्धा भरविल्या जातात.

मंडळाच्या कायम निधीत वृध्दी व्हावी म्हणून काहीं वर्षामागे कै. शैला कडवाडकर ह्या अध्यक्ष असतांना बाहेरुन ऑर्केस्ट्रा आणून संगीत रजनी कार्यक्रमाद्वारे ४५००० रु. लाभ मिळविला होता. ५-६ वर्षामागें कै सुहासिनी बोरकर त्यांच्या मुलाने (श्री. सुशीलकुमार बोरकर, कर्नाटकचे माजी पोलीस मुख्य आयुक्त) आपल्या आईच्या स्मरणार्थ महिला मंडळाच्या इमारतीच्या मागील बाजूस एक हॉल बांधून दिला आहे. यंदा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मंडळानें इमारतीच्या चहूं बाजूस फरशा बसवून घेतल्या आहेत.

जी कारवारकर मंडळी आता मुंबई व अन्यत्र स्थायिक झालेली आहेत त्यांच्या आठवणी हा लेख वाचल्यावर चाळवल्या जातील. त्यांना ५०-६० वर्षापूर्वी आपल्या आई-मावशी -बहीण किंवा शेजारणीबरोबर ह्या मंडळाच्या कार्यक्रमात सहभागी झाल्याचे आठवेल. हा लेख लिहिण्यात मला लीला पुरुषोत्तम (डेंटिस्ट) नाडकर्णी, वय ९४ वर्षे, वास्तव्य पुणे, यांचे बहुमूल्य साहाय्य झाले त्यांना माझे हृदयपूर्वक धन्यवाद.

आता ह्या मंडळाची अध्यक्षा सुलोचना हेगडे व उपाध्यक्षा वीणा कडवाडकर ह्या आहेत. अनेक स्त्रियांचे योगदान ह्या मंडळाच्या उत्कर्षासाठी लाभलेले आहे त्यांना माझे अभिवादन. कारवार महिला मंडळास माझ्या हार्दिक शुभेच्छा. ह्या अमृतमहोत्सवानंतर शताब्दी महोत्सव दिमाखात पार पडावा ही श्रीचरणीं प्रार्थना.

**शांताराम (अरुण) स. कुलकर्णी**
**कारवार (०८३८२-२२७०४८)**

# कारवार महिला मंडळाच्या अमृत वर्षी महोत्सवानिमित्त
# कांही रम्य आठवणी

इ.स. १९३९! जगभर वातावरण महायुध्दाच्या झळानी तापलेले! अशावेळी ब्रिटिशांच्या हुकुमती खालील हिंदुस्थानात मात्र वेगळ्या विचारांचे वारे वाहत होते. म. गांधीच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने स्वातंत्र्याची मागणी केली. त्या मागणीपासून हिंदी लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी ब्रिटिशांनी Local Self Government च्या लोण्याची लालूच देऊन जनतेला खूष करण्याचा प्रयत्न केला. १९३९ साली तेव्हाच्या मुंबई इलाख्यात बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळ स्थापन झाले.

या सर्व घडामोडीनी मुंबई इलाख्यातील गावोगावी वातावरण उल्हसित झाले. स्वातंत्र्याच्या चळवळीतील पहिले पाऊल यशस्वी ठरले अशी जनतेची भावना झाली. आमच्या कारवारसारख्या लहानशा शहरात देखील उत्साहाला उधाण आले. गाव लहान असले तरी लोक सुसंस्कृत आणि पुरोगामी होते. स्त्रिया देखील याला अपवाद नव्हत्या. जेमतेम लिहिता वाचता येणाऱ्या स्त्रिया देखील भोवतालच्या परिस्थितीचा वेध घेऊन स्वत:चा उत्कर्ष कसा करता येईल याचा विचार करु लागल्या.

अशाच विचारी सुसंस्कृत स्त्रियांचा एक गट कारवारमध्ये होता. स्त्रियांच्या उन्नतीसाठी आपण महिलांनीच एकत्र येऊन काही तरी केले पाहिजे असा त्यांचा विचार होऊ लागला. यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन एक संस्था काढावी ज्यामुळे स्त्रियांच्या हितासाठी काहीतरी करता येईल असे ठरले.

त्यात पुढाकार घेणाऱ्या स्त्रिया प्रामुख्याने होत्या उषादेवी मुझुमदार ऊर्फ पदुताई, शांताबाई गंगोळी, सरोजिनी बोरकर, वासंती कसबेकर अहिल्याबाई वाघ, इंदुमती हट्टंगडी, सीताबाई चंदावरकर, सुशीला उप्पोणी, राधाबाई नाडकर्णी, राधाबाई वाघ इत्यादी.

यावेळी हिदुस्थानातील कर्त्या स्त्रियांनी एकत्र येऊन स्थापन केलेली एक संस्था होती 'अखिल भारतीय महिला समाज'. आमच्या स्त्रियांनी मार्गदर्शनासाठी त्यातील प्रमुख कार्यकर्त्या हुबळीतील उमाबाई कुंदापूर यांना पाचारण केले. त्यांनी प्रोत्साहन तर दिलेच परंतु स्वत: येऊन मार्गदर्शन देखील करत.

१ फेब्रुवारी १९३९ या शुभ मुहुर्तावर 'कारवार महिला मंडळ' या संस्थेची स्थापना झाली. मंडळाची स्थापना झाल्यावर आर्थिक मदतीसाठी कोणाकडे हात न पसरता स्वत:च्या प्रयत्नाने स्वयंपूर्ण बनावे या विचाराने या महिलांनी नाटक बसविण्याचे ठरविले. कल्पना करा, ज्यावेळी सभासमारंभात देखील स्त्रियांची उपस्थिती दुर्मिळ होती अशावेळी नाटक बसविण्याचे धाडस कौतुकास्पद होय!

नाटकात स्त्रियांना पुरुषांचे वेष करावे लागू नयेत म्हणून पुरुषपात्र विरहित नाटक बसवावे असा विचार ठरला. यासाठी किर्लोस्करवाडीतील प्रख्यात नाटककार ना. धों.

ताम्हणकर यांना या स्त्रियांनी विनंती केली. स्त्रियांच्या या आगळ्या मागणीने ते इतके भारावून गेले की पुरुषपात्रविरहित नवीन नाटक लिहून 'नव्याजुन्या' नावाने त्याचे हस्तलिखित त्यांनी या महिलांना पाठवून दिले. मोठया उत्साहाने स्त्रियांनी ते नाटक बसविले. त्यात गायनकुशल इंदुमती हट्टंगडी, उषादेवी मुझुमदार, रमा वाघ, मीरा वाघ वगैरे महिला होत्या. स्त्रियांच्या या धाडसी पावलाला पुरोगामी कारवारकरांनी प्रोत्साहन दिले. त्यांच्या भरघोस पाठिंब्याने महिलामंडळाची आर्थिक उभारणी भक्कम झाली.

यानंतर काय! या महिलांच्या उत्साहाला भरते आले. स्त्रियांच्या प्रगतीसाठी शिवणाचा क्लास, भरतकामाचा क्लास, कागदी फुलांचा क्लास वगैरे चालवून स्त्रियांना सर्वांगीण कुशल बनविण्याचा उपक्रम त्यांनी चालू केला. विविध प्रदर्शने भरवून मंडळाची आर्थिक बाजू मजबूत करण्याचे प्रयत्न चालू होतेच.

यानंतर विशेष अभिनंदनीय उपक्रम म्हणजे गरीब मुलांना मोफत दूध व औषधे वाटणे. World Health Organisation मार्फत मिल्क पावडर मिळवणे त्याचप्रमाणे उषादेवी मुझुमदार यांचे पती डॉ. आनंदराव मुझुमदार यांच्याकडे जे मेडिकल रिप्रेझेंटेटीव्ह येत त्यांच्या कडून औषधे व टॉनिक मिळवणे या योजनेमुळे दूध केन्द्र चालविणे मंडळाला सुलभ झाले. जी गरीब मुले येत त्यांना डॉ. मुझुमदार रविवारी तपासून योग्य टॉनिके व औषधे मोफत देत. या सर्व खटपटीमुळे दूध केन्द्र जोरात चालले व गोरगरीबांचा दुवा संस्थेला मिळू लागला.

१९४७ साली अखिल भारतीय महिला समाजाची वार्षिक परिषद मंडळाने कारवारला भरवली ती इतकी यशस्वी झाली की सर्व ठिकाणी मंडळाचे नाव झाले. याचप्रकारे तिकिट लावून नाटके करुन पैसे जमविल्यावर त्या आर्थिक पाठबळावर मंडळाने समुद्रकिनारी मंडळाची स्वत:ची टुमदार इमारत उभी केली. ती आजही दिमाखाने उभी आहे.

मंडळाच्या स्थापनेला यावर्षी ७५ वर्षे पुरी झाली. मंडळाच्या संस्थापक महिलांपैकी बहुतेक काळाच्या पडद्याआड गेल्या तरीही त्यांच्या असामान्य कर्तृत्वाला आमचे लक्ष लक्ष प्रणाम!!!

**हेमलता तिळवे, पारले (२६१९१२४५)**
**(पदुताई मुझुमदार यांची कन्या)**

## विवाह /वाङ्‌निश्चय

मंगेश (आदित्य) गौतम संजगिरी, माहीम व द्वितीया अनिल पाटील, दादर

# लय भारी 'गाठ'

"अरे,ऽ झोपेत आहेस काय ? नीट डोळे उघडून बघ. कुणाशी बोलत आहेस ते. याद राख-माझ्याशी गाठ आहे." समोरच्या दूरदर्शनवर कार्यक्रम बघताना डुलकी लागलेली कळलीच नाही. दचकून बघते तो काय गाठ कधीच पडली होती. पण तो माझ्याशी कोण हे शेवटपर्यंत कळलेच नाही. डोळयाला पाणी लावले नी येऊन बसले. पण त्या गाठीने मला घेरलेच. किती मस्त शब्द-गाठ. पहिला क्रमांक-जन्मगाठ, जाम चिकटून बसते. दुसरा क्रमांक-स्मरणगाठ. विसराळूना आपण सांगतो, पदराला गांठ मार म्हणजे आठवतं.

कुणी मित्र, नातलग आल्याचं कळतांच त्याचीपण गाठभेट घेतोच.

हे सारं कमी पडतं म्हणून की काय, ही गाठ आपल्या अन्नातही घुसली आहे. घरातल्या शुभ कार्याच्या जेवणांत आमच्या सारस्वतांत मूगा-गाठी हवीच. त्यातल्या मूगाची तोंडाशी गाठ पडते. बस्स त्यापलीकडे संबंध नाही. अळूच्या पानाच्या गाठीचेही तसंच. पानं धुवून पुसून स्वच्छ जमिनीवर पालथी घाला, नरम पडतात. त्याच्या मग उभ्या पट्टया काढतात. त्या तळव्यावर फिरवून पीळ घालतात. बोटाभोवती वरती एक पिळा करायचा. नी बाकीचा भाग एकत्र फिरवून त्याचा गोळा बनवत, वरच्या पिळयांत जाम बसवायचा. झाली तयार आळवागाठी. मग भिजवलेले हरभरे घालून, शिजवून, धणे, खोबऱ्याचं वाटण लावून पातळ भाजी करुन पेजेसोबत भाजी चापायची. या गाठी नी कौशल्य याची एकमेकींचं सांगड असायची. कारण, मुगाच्या वरच्या साली काढून पांढरे मूग ठेवून घेणे म्हणजे बघाना.

अशा कैक गांठी जीवनात पदोपदी भेटतातच म्हणा.

आतां शेवटी, अेक गंमत. आपला ब्रह्मदेव सर्वांच्या परिचयाचा. ब्रह्मा-विष्णू-महेश, उत्पत्ती, स्थिती नी लय. ब्रह्मदेवाचं काम तसं सोपं. जो तो त्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार जन्म घेतो. त्यांतुनही या ब्रह्मदेवाला रमेनासं झालं की, पृथ्वीवरच्या गाठी मारतो व गंमत करुन स्वत:ला व मानवांना खुष ठेवतो.

समजा, दोघी जिवाभावाच्या मैत्रिणी गप्पा मारताहेत, अचानक अेकीचा चुलतभाऊ तिला भेटायला येतो असाच, "अग, हा आमचा नीळकंठ बरं का" मैत्रीण होती मिस्किलच. ती लगेचच. "अग पण याचा कंठ कुठे निळा आहे ग ?" सारी हंसली नी नीळकंठाच्या मनांत ही मैत्रीण ठसली. वरती ब्रह्मदेवाने ही हंसता हसतां या दोघांची मारलीच की हो लगिनगाठ आहे की नाही. पुढे सर्वांचं मंगलच झालं बरं. देवाने लगेचच त्या दोघांच्या सुकन्या प्रभा हीस व तिच्या

साथसंगतीला तोडीस तोड असा अरुणदेवही जन्माला घातला. हे परमपित्या, असेच त्यांच्या फुलणाऱ्या वंशवेलीच्या गाठी घालत राहा रे बाबा. मात्र त्या रेशीमगाठीच घाल हो कारण, त्या लगेचच जुळून येतात नी जाम बसतात. पुढे येणाऱ्या युगांत आपली कुठेनाकुठे गाठ पडणारच त्यावेळी आभाराची गाठ घालीनच. बघा, गाठ आली ना परत. पाठ नाहींच सोडणार ती. कशीही असली तरी ती लय भारी हाय बरं. जय हो!

**दुर्गानानी वाघ, माहीम**

## वार्षिक कवळेमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेचे विजेते

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही १४ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी संस्कृत पाठांतर स्पर्धा घेण्यांत आली. सर्वप्रथम संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. नंतर संघाचे कार्यवाह श्री. सुभाष कसबेकर यांनी स्पर्धेचे उद्दिष्ट व पाठांतरासाठी गुण देण्याचे निकष विशद करुन सांगितले. त्या पश्चात मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात नमूद केल्याप्रमाणे शिशु व कुमार गटातल्या स्पर्धकांचे श्लोकपठण झाले. मध्यंतरानंतर सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यांत आल्या. निकाल जाहीर करण्यापूर्वी परीक्षकांतर्फे श्रीमती स्वाती सहस्रबुध्दे यांनी स्पर्धकांना योग्य ते मार्गदर्शन केले. श्री. सुभाष कसबेकर यांनी स्पर्धेचे उत्कृष्टपणे सूत्र संचालन केले.

### विजेत्यांची नावे

### शिशुगट (६ वर्षाखालील)

१. ऋतुजा मंगेश धुमे, दादर * २. सानिका विनोद भट, मुलुंड
३. संजना विनोद भट, मुलुंड
**उत्तेजनार्थ :** आदित्य उल्हास नेत्रावळी, पारले व अयान गिरीश तेलंग, माहीम

### शिशुगट (६ वर्षावरील)

१. निनाद नीलेश वागळे, अंधेरी * २. शर्वणी शैलेश फेणाणी, दादर
३. अर्णव शैलेश फेणाणी, दादर
**उत्तेजनार्थ :** प्रियांका गिरीश दळवी, ठाणे व शुभन सचिन तेलंग, गावदेवी

### कुमार गट

१. शुभन सचिन तेलंग, गावदेवी. ** २. प्रियांका गिरीश तेलंग, ठाणे
३. संजना विनोद भट, मुलुंड व अमेय मंदार पंडित, पारले (विभागून)
**उत्तेजनार्थ :** आदित्य उल्हास नेत्रावळी, पारले व अमेय उल्हास नेत्रावळी, पारले

* दिनकर लक्ष्मण कुलकर्णी व शिवानंद मंगेश वाघ स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेली पारितोषिके या विजेत्यांना मिळाली.
** आनंद गणपती वर्टी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेले पारितोषिक या विजेत्याला मिळाले.

# अशीही एक समाजसेवा

कुठल्याही समाजकार्याला दाम व घाम या दोघांचीही आवश्यकता असते. जे देणगी ऊर्फ दाम देतात त्यांचे नांव कागदोपत्री प्रसिध्द होते व इतरांना समजते. पण जे आपले श्रम किंवा घाम देतात त्यांचे नांव कागदोपत्री कुठेच नसते व ते बाकीच्यांना समजत नाही. खरे तर त्यांचेच कार्य श्रेष्ठतर. ज्ञातिबांधवांच्या अशाच एका घामाच्या समाजकार्याचे हे वृत्त.

माझ्या एका मावसमामाची नात म्हणजे दादर येथे राहणारी छपन्न वर्षाची कु. सीमा शिवानंद वागळे हिचे नुकतेच दादर येथील शुश्रूषा हॉस्पिटल येथे निधन झाले. तिला घरचे असे कोणीही नव्हते व ती एकटीच राहत असे. मृत्यूपूर्वी वीसेक दिवसामागे मी तिला सहज फोन केला होता तेव्हां माझ्या लक्षांत आले की तिला धड बोलताही येत नव्हते. ती म्हणाली आपल्याला कर्करोग झालेला आहे व शुश्रूषा हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागेल. तिने मला एवढेही कळविले की आपला एक मावसभाऊ अरुण वागळे हा माहीम येथील शांती सोसायटीत राहतो त्याला फक्त निरोप दे.

दरम्यान सीमाच्या शेजारणीने सीमाची एक जीवश्च कंठश्च मैत्रीण जयश्री हिला कळविले. जयश्री बिचारी धांवत आली आणि तिने सीमाला कसेबसे शुश्रुषामध्ये दाखल करुन घेतले. सुरुवातीला जयश्री रात्रंदिवस तिची वास्तपुस्त करत होती. नातलगापैकी कुणीच उपस्थित नसायचे. सुदैवाने शुश्रूषामध्ये फिजिओथेरेपिस्ट म्हणून काम करणाऱ्या डॉ. प्रज्ञा मनोहर तेलंग यांना सीमाच्या हालअपेष्टा व नातलगांची अनुपस्थिती जाणवली. पण त्यांना तेव्हांच अमेरिकेत जायचे होते. तरीही अमेरिकेतून सतत त्या आपल्या यजमानांमार्फत सीमाला मनुष्यबळ मिळवून देण्याच्या प्रयत्नांत होत्या. डॉ. मनोहर तेलंग हे आपले काका प्रो. मंगेश तेलंग यांच्यासह काही उपाय शोधण्यासाठी प्रयत्नशील झाले व त्यांनी अरुण वागळे यांच्याशी संपर्क साधला.

मीसुध्दा अरुण वागळे व प्रो. तेलंग यांच्याशी सतत संपर्क ठेऊन होते. अरुण वागळे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढाकार घेतला. वागळे यांची थोडया दिवसापूर्वीच शस्त्रक्रिया झाली होती व काठीचा आधार घेऊन त्यांना चालावे लागे. अशाही परिस्थितींत ते व तेलंग कुटुंबीय सीमाची चौकशी करण्यासाठी हॉस्पिटलमध्ये जाऊ लागले. सीमाची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत होती. डॉक्टर्सनी सांगितले की तिच्यावर आता उपचार करणे अशक्य आहे व तिला घरी न्या. घरी किंवा 'अवेदन' सारख्या आश्रमांत नेणे अशक्य होते. वागळे व प्रो. तेलंग यांच्या विनवणीनें व प्रज्ञा तेलंगच्या मध्यस्थीमुळे सीमा हॉस्पिटलमध्येच राहिली. शेवटी १२ सप्टेंबर रोजी रात्री सीमाचे निधन झाले व ती बातमी रातोरात सर्वांना, प्रज्ञाना सुध्दा,

समजली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी, अरुण वागळे, प्रो. तेलंग, जीवन उदय तेलंग, जयश्री वगैरे सारे शुश्रूषामध्ये उपस्थित राहिलो. वागळे यांनी स्वत: होऊन जबाबदारी घेऊन देह ताब्यात घेतला व सायन येथील स्मशानभूमींत दहन केले. या सुहृदांनी पुढाकार घेतला नसता तर सीमाचे बेवारशी म्हणून दहन झाले असते व ज्ञातीला ती घटना नामुष्कीची ठरली असती.

जीवन तेलंग दहनाच्या वेळी घरी जाऊन स्वत:ची गाडी घेऊन आला, कां तर, सायनहून परत येतांना वागळेंच्या दुखऱ्या पायांना त्रास होऊ नये म्हणून. या सर्व निरलस कार्यांत वागळे यांच्या पत्नी मंगलावहिनी यांचा संपूर्ण पाठिंबा होता. 'तुम्हांला ही भानगड कुणी सांगितली आहे ?' अशा प्रकारचा नकारात्मक सूर अजिबात नव्हता.

जयश्री, वागळे व तेलंग कुटुंबीय ह्यांनी ज्या आत्मीयतेने अपार श्रम घेतले, त्यांना माझा प्रणाम. जगांत अजुनही माणुसकी आहे म्हणूनच जग चालते.

सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे ज्ञातिबांधवांना अशाही प्रकारची समाजसेवा असू शकते हे कळावे म्हणून हा प्रपंच

**शुभदा कशेळीकर, माहीम**
**(माहेरची शुभा नरहर तेलंग, नंदव्हाळ)**

## मुंबई मंच – कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **तारीख व समय** | : रविवार २८ डिसेंबर २०१४ संध्याकाळी ५.०० ते ९.०० |
| **कार्यस्थळ** | : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण |
| **आकार** | : रु. ७०० एका गाळयासाठी |
| **संपर्क** | : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी. |

**प्रसाद गायतोंडे : ९८१९४११३३७ राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : २० डिसेंबर २०१४.**

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठया संख्येने हजर राहावे.

# प्रतिक्रिया

## सदाशिवगड येथील पहिली कार डॉ. कृष्णराव वाघ यांची

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकांत सदाशिवगड येथील डॉ. कृष्णराव वाघ यांच्याविषयी एक हृद्य लेख प्रसिध्द झाला होता त्या अनुषंगाने माझी एक जुनी आठवण ताजी झाली.

डॉ. वाघ यांनी त्या काळात सदाशिवगड येथे पहिली कार आणली. ही साधारण १९४२ ची गोष्ट आहे. त्यावेळी मी शाळेत होतो. प्रत्येक शनिवारी माझ्या वडिलासोबत, (दिवेकर मास्तर) आमच्या गांवी कणसगिरीला माझ्या आजीला भेटायला आम्ही कारवारहून जात असू. त्यावेळी डॉ. वाघ यांची हमखास भेट होत असे.

त्यावेळी कारवारला आठवडयातून दोनदा मुंबईहून आगबोट येत असे. आम्हां मित्रांचा उद्योग की ती आगबोट बघायला बैतखोलला जाणे. एक दिवस एक लहानशी पोपटी रंगाची मोटरकार पडावांतून धक्क्याकडे येतांना दिसली. चौकशी केल्यावर कळले की ही डॉ. वाघ यांची गाडी आहे व ती सदाशिवगडला जाणार आहे. मग काय! ही मजा बघायला आमची गँग तेथेच थांबली. ती कार क्रेन लाऊन धक्क्यावर घेण्यांत आली व ती पुढे कोडीबागला गेली आणि नंतर 'तार' ओलांडून सदाशिवगड येथे गेली, ती 'ऑस्टिन' किंवा 'हिलमन' असावी.

हे दृष्य माझ्या डोळयांसमोर सत्तर वर्षानंतर अद्यापही आहे. माझी कारवारविषयी आणखी एक महत्वाची आठवण नमूद करु इच्छितो. कारवारचे पहिले सुतिकागृह आपल्या बँकेचे संस्थापक शेठ शांताराम कुलकर्णी यांनी दिलेल्या पंधरा हजार रुपयांच्या देणगींतून ८० वर्षापूर्वी म्हणजे १९३५ साली साकार झाले व त्याचे उद्‌घाटन तेव्हांच्या मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड ब्रॅबॉर्न यांच्या हस्ते झाले होते. कारवारच्या सिव्हील हॉस्पिटलच्या आवारांत असलेले हे 'श्रीशांतादुर्गा मॅटर्निटी होम' कारवारचे एक लँडमार्कच होते.

**मोहन दिवेकर, पुणे**

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

**दिनांक :** रविवार ११ जानेवारी **प्रस्थान :** माहीम मुलुंड. ठाणे

**आकार :** रु. ४५० अंदाजे (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)

**स्थळ :** अद्याप ठरलेले नाही. डिसेंबर महिन्यात संपर्क साधावा.

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | राजू बोरकर |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९८२०९१७८४१ |


www.kccgoa.in
वीण विश्वासाची, सोबत निसर्गाच्या कुशीची
कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता. विश्वासाच्या याच वीणीतून साकारलेल्या गोव्यातील 'सुखसमृद्धी' संकुलात आजच तुमची वास्तू पक्की करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेले सुखमय समृद्ध संपन्न आयुष्य.
प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता येईल यात काही शंकाच नाही.
सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर दीर्घायुष्याचं वरदान ठरेल हे नक्कीच.
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, मंगेशी, फोंडा- गोवा
देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा
मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा
वेलिंगचा नृसिंह, मडकईचा नवदुर्गा
अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या
सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन,
1 बी.एच.के, 2 बी.एच.के
प्रोजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था
a Project by: कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: 2683 3841/47/ 72. मोबा: 98336 36451
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

# कै. दत्तात्रय पालेकर (पोटली दत्ता) यांच्या ५० व्या पुण्यतिथीप्रसंगी पुण्यस्मरण

अलीकडे झी मराठी वाहिनीवर 'एका लग्नाची तिसरी गोष्ट' या नावाची रक्ताच्या नात्याएवढीच प्रिय आणि दृढ अशा मानलेल्या नातेबंधाविषयी एक लोकप्रिय मालिका प्रदर्शित केली जात होती. तेव्हां मला माझ्याच 'मानलेल्या' नातेबंधाची प्रकर्षाने जाणीव झाली.

मी मूळचा शिरोडा बोरी या गांवचा. आमच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. म्हणून आम्ही मंगेशीच्या अग्रशाळेत एका खोलीत कसेबसे जीवन कंठीत होतो. सुमारे १९५० साली श्री. दत्तात्रय वैकुंठ पालेकर हे सहकुटुंब मुंबईहून श्रीच्या दर्शनासाठी म्हणून तेथे आले होते. त्यावेळी त्यांचा मुक्काम आमच्या खोलीच्या शेजारीच होता. माझी मोठी बहीण एकदा सहज म्हणून त्यांच्या खोलीत गेली होती. बोलता बोलता तिने आमच्या घरच्या कठीण परिस्थितीची त्यांना माहिती दिली व तिने त्यांना विनंती केली की आपला एक सात वर्षाचा लहान भाऊ आहे त्याला तुम्ही मुंबईत नेऊन त्यांचा सांभाळ करु शकता का ? त्यांनी व त्यांच्या पत्नी इंदिराआई यांनी लगेच होकार दिला. मी त्यांच्याबरोबर मुंबईत येऊन अमृतवाडी येथे स्थायिक झालो व लहानाचा मोठा झालो.

माझे शालेय शिक्षण, मुंज वगैरे त्यांनीच केले. त्यांच्या दोन्ही मुली ज्योती व पुष्पा (दोघीही आताच्या तेलंग) यांनी मला भावासारखे मानले. अजूनही आमचे संबंध अत्यंत आपुलकीचे आहेत. एकमेकाच्या कार्यात तसेच सुखदु:खांत आम्ही सहभागी असतो.

त्या वडिलांना अण्णा म्हणत व मीही त्यांना अण्णाच म्हणत असे. त्यांच्या हातात सतत एक पिशवी असायची म्हणून कारवारकरांत ते 'पोटली दत्ता' या नावांनेच परिचित होते. आज मी जो माझ्या स्वत:च्या पायावर उभा आहे ते सर्वस्वी पालेकर कुटुंबीयांमुळेच.

२२ डिसेंबर १९६४ साली अण्णांचे निधन झाले. त्यांच्या ५० व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण.

**प्रकाश गुडे, गोरेगांव**



।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**
**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov / Churma
- Dry Fish - Suke Bangde, Mori & Sungta

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

# आठवणीतलं घर 'सुंदर निवास', सरस्वती बाग, जोगेश्वरी



**पुनर्बांधणी पूर्वीचे 'सुंदर निवास'**

सारस्वत कॉलनी, जोगेश्वरी (पूर्व) येथे असलेलं आमचं घर म्हणजे माझे पणजोबा (आईच्या आईचे वडील) शंकर जोगप्पा वागळे यांनी १८ रु. पगारावर पोस्टात खर्डेघाशी करुन बांधलं. त्या पगारातून तीन मुलींची लग्ने, मुलांची शिक्षणे, पै-पाहुणा आला गेला यांचा आदर सत्कार इ. करुन उरलेल्या बचतीतून बांधलेला एक मजली बंगला. माझी पणजी (होडली आई) हिच्या इच्छेखातर हा सारस्वत कॉलनीतील रामेश्वर मंदिराच्या अगदी शेजारचा प्लॉट माझ्या पणजोबांनी निवडला. त्यांच्या आईचे नाव सुंदर. तिच्या स्मृतीखातर बंगल्याचे नाव 'सुंदर निवास' ठेवले गेले.

बंगला पूर्वाभिमुख होता. बंगल्याच्या उत्तरेस रामेश्वर मंदिरापुढचा मोकळा प्लॉट होता. बंगल्याच्या वायव्य कोपऱ्यात रामेश्वर मंदिर होतं. बंगल्याची रचना म्हणजे मध्ये एक मोठा हॉल व त्याच्या दोन्ही बाजूला दहा बाय दहाच्या तीन-तीन खोल्या. हॉलच्या पुढे-मागे दोन्ही बाजूला मोठेमोठे व्हरांडे होते.

होडली आई अतिशय देवभक्त असल्याने सकाळी उठल्याबरोबर रामेश्वराचे दर्शन घडावे म्हणून पहिल्या मजल्यावरची पश्चिमेकडील खोली तिने स्वत:करिता ठेवली होती. नंतरच्या पुढच्या दोन खोल्या आईच्या सर्वात धाकटया व मोठया मामासाठी ठेवल्या गेल्या होत्या. हॉलच्या दक्षिणेकडे असलेली खोली आईच्या मधल्या मामाकरिता होती तर त्याच्या शेजारच्या खोलीत होडली आईचे सुंदर देवघर होते. त्याच्याही पुढे येणारी खोली म्हणजे स्वयंपाकघर, मागचा व्हरांडा त्यात सामील करुन स्वयंपाकघर प्रशस्त बनवले होते. एकूण बंगला फारच सुंदर दिसत असे.

होडल्या आईला आपल्या मुलीदेखील आपल्या सोबत राहाव्या असे वाटत होते, म्हणून तिने पणजोबाकडून बंगल्याचा एक मजला बांधून घेतला आणि आपण व आपली मुलं यांनी पहिल्या मजल्यावर राहायचे आणि मुलींनी तळमजल्यावर अशी स्वप्नं पाहिली, परंतु प्रत्यक्षात तिच्या मुलांनी पहिल्या मजल्यावर वास्तव्य केले, परंतु मुली या ना त्या कारणाने तळमजल्यावर राहायला आल्याच नाहीत, तिची इच्छा थोडयाशा प्रमाणात का होईना माझ्या आईने म्हणजे तिच्या नातीने पूर्ण केली.

बंगल्याकडे तोंड करुन उभं राहिलं असता उजवीकडच्या आगगाडीसारख्या लाईनीत ३ खोल्यांत माझ्या आई-बाबांचा संसार होता. माझा आणि माझ्या धाकटया भावाचा जन्म या घरातच झाला. माझ्या वयाच्या पंचविशीपर्यंत आम्ही याच घरात राहिलो. या घराने आम्हाला मायेची उब दिली, एकमेकांवर प्रेम करायला शिकवलं, आपुलकी शिकवली. या घराने आयुष्यातील अनेक उन्हाळे, पावसाळे पाहिले. आमच्या आयुष्यातील अनेक उत्कट प्रसंगाचे ते घर साक्षीदार राहिले. माझ्या बालपणातील, कळत्या वयातील असंख्य आठवणी त्या घराशी निगडीत होत्या.

माझ्या पणजोबांना मी पाहिलं नाही. मला आठवते तेव्हापासून पहिल्या मजल्यावर आईचे तीन मामा आपल्या कुटुंबियांसह राहात तर तळमजला भाडेकरुंसाठी दिला होता. आम्ही नातेवाईक असलो तरी माझी आई ही पणजोबांच्या मुलीची मुलगी असल्याने आम्ही भाडेकरुच होतो आणि महिना २३ रु. भाडे भरुन राहात होतो.

बंगल्याच्या भोवती आईच्या प्रत्येक मामांची वेगवेगळी मोठी बाग होती. बंगल्याला लोखंडी मोठं गेट होतं, पण ते बहुतेक बंदच असे. त्याला एक जेलसारखा छोटा दरवाजा होता. तोच येण्या-जाण्यासाठी वापरला जाई. गेटवर फुलांचा वेल सोडण्यासाठी एक लोखंडी कमान होती. त्यावर जाईचा वेल फुललेला असे. संध्याकाळी खाली फुलांचा सडा पडे.

त्याकाळी आमची संपूर्ण कॉलनी म्हणजे छोटीछोटी बंगल्यासारखी घरं आणि त्याभोवती गर्द झाडी असलेली बाग अशी होती. संध्याकाळी सात नंतर रस्त्यावर शुकशुकाट असे. आमच्या घरासमोरच्या रस्त्यावर आम्ही मुलं खडूने चौकट काढून खेळत असू. एखादी-दुसरी गाडी क्वचित जाई. कुणाच्याही घरी गेलं की निघताना सवाष्णीला हळदकुंकू, बागेतलं एखादं फुल दिलं जाई. कडीपत्ता, शेवग्याच्या शेंगा विकत आणायच्या असतात हे आम्हाला ठाऊकच नव्हते. "लक्ष्मण, दोन शेंगा घेऊन ये रे." म्हटलं की आमचा घरकामाचा गडी त्याच्या दुसऱ्या कामावर विचारुन शेंगा घेऊन येई; समोरच्या कुलकर्ण्यांच्या बंगल्यातून कडीपत्ता आणला जाई.

संपूर्ण कॉलनीत त्याकाळी एक प्रकारचा एकोपा होता. हेवे-दावे असत तरी सर्वजण एकमेकांच्या सुखदु:खात सहभागी होत. कुठलीही नवीन बातमी वाऱ्याप्रमाणे कॉलनीत पसरायला वेळ लागत नसे.

आमचा बंगला बाहेरुन चांगला दिसत असला तरी वेळेवर डागडुजी न केली गेल्याने आतून पार खिळखिळा झाला होता. पावसात तर आमचे असे काही हाल होत की विचारू नयेत. त्यातल्या त्यात हॉलमध्ये तर गळत नाही असा कोणताही कोपरा शिल्लक राहात नसे. आमचे तर काहीच नाहीत इतके हाल पहिल्या मजल्यावर राहाणाऱ्या आईच्या मामांचे होत. 'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे पावसाळ्याआधी 'नेमेचि गच्चीवर डांबर घालणे' हा उद्योग असे. एक वर्षी तर या गळतीवर उपाय म्हणून आईच्या मामांनी संपूर्ण गच्चीला सर्कसच्या तंबूच्या कापडाचे आच्छादन केले होते. बिल्डींगची गच्ची म्हणजे सर्कसचा मिनी तंबू दिसत होता. हा प्रयोग कितपत यशस्वी झाला हे काही आता आठवत नाही, परंतु बिल्डींग जास्त दिवस टिकत नाही हे लक्षात येऊन आईच्या मामांनी ती बिल्डरला विकून त्याजागी आताची ४ मजली इमारत झाली व आम्ही अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर एप्रिल १९८७ साली या नवीन घरात राहायला आलो.

नूतन वास्तूच्या  नामकरण सोहळ्याच्या सभेमध्ये नवीन आलेल्या फ्लॅटधारकांनी अगोदरच्या 'सुंदर निवास' याच नावावर शिक्कामोर्तब केलं आणि आमच्या पूर्वजांची स्मृती जतन झाल्याच्या आनंदात आम्ही कृतकृत्य झालो.

**विद्या धुमे**
vidyadhume@gmail.com

**(पूर्वप्रसिध्दी : दै. लोकसत्ता, वास्तुरंग १३ सप्टेंबर २०१४)**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine India & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# श्रध्दांजली
# गिरीश मुजुमदार



**(२६ नोव्हेंबर १९४७ - ५ जुलै २०१४)**

व्हँकूव्हरमधील मराठी मंडळाचे माजी अध्यक्ष आणि इथल्या मराठी समाजातील एक सन्मित्र गिरीश श्रीनिवास मुजुमदार यांचे अचानक निधन समस्त मराठी मित्रमंडळास धक्का, शोक, दु:ख यात बुडवून गेले.

५ जुलै रोजी पत्नी जया व मुलगी सई यांच्यासह जवळच्या पर्वतावर गिर्यारोहणाला गेला असतांना तेथे अचानक गिरीशचे प्राणोत्क्रमण झाले. चहा–कॉफीदेखील न पिणारा, सदैव आवडीने व्यायाम करणारा, आरोग्याचा आदर्श म्हणावा, असा गिरीश शेवटच्या क्षणापर्यंत आनंदी आणि उत्साही होता. कारवारमध्ये जन्म, इंदोरमध्ये शिक्षण, सिव्हिल इंजीनियरची पदवी, १९७४ मधे कॅनडात पदार्पण, अकरा वर्षे वेस्टकॅन या कंपनीत प्रोजेक्ट मॅनेजर, आणि अनेक वर्षे स्वत:च्या कन्स्ट्रक्शन कंपनीचा प्रेसिडेंट अशी त्याची व्यावसायिक कारकीर्द होती. डिसेंबर १९७७ पासून त्याची सहधर्मचारिणी असलेल्या जयामुळे गिरीशचे घर सर्वांच्या स्वागताला तत्पर असे. मुलगा नील, सून आयाको आणि मुलगी सई असा त्याचा परिवार.

गिरीश मुजुमदार हा जगमित्र म्हणावा असा उमदा माणूस. सदैव हंसरा चेहरा. कोणालाही जमेल ती मदत करायला तत्पर. व्हँकूव्हर परिसरात राहायला येणाऱ्या प्रत्येक नव्या मराठी माणसाला, आणि इतरांनाही त्याच्या घरगुती स्वागताचा लाभ, मदतीचा हात आणि नंतरही सतत जिव्हाळयाच्या सल्ल्यांची बरसात मिळत असे. गिरीश सदैव एक खंदा सेवाभावी कार्यकर्ता म्हणून सगळ्यांना परिचित होता. मंडळाच्या कुठल्याही कार्यक्रमाच्या अर्धा तास तरी आधी येऊन जागा साफ करणं, खुर्च्या मांडणं वगैरे तयारी, आणि कार्यक्रमानंतरही थांबून झाडू फिरवण्यापर्यंत लागतील ती ती कामं करायला गिरीश नेहमीच पुढे असे. मंडळाच्या कोणत्याही कार्यक्रमाच्या नव्याजुन्या आयोजकांचे, आणि कलाकारांचे लेखी कौतुक करण्यातही गिरीश नेहमीच पहिला असायचा. व्हँकूव्हरमध्ये जेव्हा नव्याने हापूस यायला लागले, तेव्हा ते आल्याची बातमी सर्वांपर्यंत पोचवायला गिरीशचा पहिल्यांदा फोन यायचा, नंतरच्या काळात ई–मेल येऊ लागली.

त्याची लोकसंग्रहाची प्रेरणा कायम जागृत असे. आमच्या गावात मराठी मंडळाची

स्थापना करण्याचे जेव्हा घाटत होते, तेव्हाची पहिली बैठक गिरीशच्या घराच्या बेसमेंटमध्येच भरली होती. त्या मराठी सोसायटीचा प्रेसिडेंट असतांना लोकांना एकत्र करुन निसर्गाच्या सानिध्यात फिरवण्यासाठी गिरीशने 'प्रेसिडेंट्स वॉक' हा एक उपक्रम बर्नबीच्या सेंट्रल पार्कमध्ये सुरु केला. व्हँकूव्हर डाउनटाउनमध्ये कामे करणाऱ्यांसाठी आठवडयातून एक दिवस लंचला एकत्र जमण्याचाही उपक्रम त्याने अनेक वर्षे चालवला. टेरी फॉक्स रनसाठी मराठी सोसायटीची टीम घेऊन पैसे उभे करण्यासाठी गिरीश गेली २५ वर्षे झटत असे. काही वर्षांपूर्वी बृहन्महाराष्ट्रवृत्तामध्ये व्हँकूव्हरबद्दल लेख लिहायलाही त्याने लेखणी उचलली होती आणि अलीकडे फेसबुकवर तो आपल्या मनोगतांचा एक ब्लॉगही लिहीत असे.

व्हँकूव्हरमधील मराठी आणि अमराठी समाज गिरीश मुजुमदारच्या निरलस सेवेमुळे आणि जनसौहार्दामुळे त्याचा निरंतर ऋणी राहील.

**विद्युल्लेखा वाघ अकलूजकर (रिचमंड, कॅनडा)**

(बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका, या संस्थेतर्फे 'बृहन्महाराष्ट्र वृत्त' हे मुखपत्र प्रसिध्द केले जाते. त्याच्या ऑगस्ट २०१४ च्या अंकातून सदर लेख उद्‌धृत केलेला आहे. विशेष म्हणजे दिवंगत गिरीश मुजुमदार व मृत्युलेख लिहिणाऱ्या विदुषी डॉ. विद्युल्लेखा वाघ अकलूजकर हे दोघेही मूळचे कारवारी. साता समुद्रापलीकडील व्हँकूव्हर येथे ते परत एकमेकांच्या सानिध्यात येतात म्हणजे 'यथा काष्टं च काष्टं च' असा योग समजायला पाहिजे.)

## दिवंगत सुनीती तेलंग

नुकतीच जीवावर बेतलेल्या आजारांतून उठले. नी पार्ल्याच्या मुलीकडून परत माहीमच्या घरी आले आणि तिसऱ्याच दिवशी मुखपत्रिका–आम्हां ज्ञातीचं टॉनिकच म्हणाना– हातात आलं. पान उघडलं तर चि. अरुण व सौ. प्रभा यांच्या विवाहाची ५० वर्षांची प्रभा झळाळत होती. अरुण माझा नात्याचाच, आणखीन् सुखावले नी पुढे त्रैमासिक चाळू लागले. अरे, हा फोटो कुणाचा, ही तर आमची सुनीतीवाहिनी, पण वरची 'Sad Demise' ही काजळलेली अक्षरे, फोटोखाली ९३ हा आकडा.

मनातून सरसर अेक चलत् चित्रपटच सरकू लागला. आमच्या कारवारच्या रा. रा. गणपतराव तेलंग यांची थोरली सून, श्री आप्पाची अर्धांगी. माझं माहेर नी तेलंगाचं एकमजली घर. मध्ये फक्त एक डांबरी रस्ता. नात्याने ते माझे भावोजी, त्यांचेही उत्तुंग व्यक्तिमत्त्व. लग्नानंतर सुनीतीवहिनी सासरी आल्याचं समजताच आईला सांगून पळाले त्यांच्या घरी.

नवी नवरी थकून आलेली पण ती इतकी गोड हंसली की माझें मन तुझे नी तुझे मन माझे झाले. अगदी नकळत. ते मन दिवसागणित फुलतच होते. त्यांचं नऊवारी नेसणं, हंसत वावरणं, सर्वांशीच बरं.

घरांतही किती माणसं–भावोजी, आप्पा, त्यांची आत्या ही माझी काकी (भावाकडे राहाणारी) चुलत दीर, जाऊ वगैरे. मागच्या जुन्या छोट्याशा घरांत राहाणारी भावोजींची बहीण बाई (तिचे नावंच ते) सोयराक्का (कुसुम सोहोनीची सासू) अण्णा–विश्वनाथ तेलंग त्यांची पत्नी, वैनी वगैरे. यातल्या बाई नी सोयराक्का लाल अलवण नेसणाऱ्या म्हणजे सोवळयांचं ओवळयाचं झंझट मागे आलंच. सर्दी तापांतही असो आपल्या आपाच्या घरचं माणूस म्हणताच चैतन्य येई अंगात, बाहेरची रयतमाणसं, त्यांचंपण चहापाणी, जेवण व्यवस्थित.

मुंबईहून कै. दत्तारामची पत्नी शरद कधी सुट्टीत आली तरी तिचं हंसरं कौतुक मागे राहलं नाही. सुट्टीत नणंद, त्यांची मुलंबाळं, आजही त्या सर्वांना तिची उणीव भासल्याशिवाय राहणारच नाही. मन हे असंच असतं हो.

घरचं सोडा, पण बाहेरच्या कामवाल्यांचंही हवं नको बघायचं. त्यांच्याकडे पत्री गणपती दीड दिवसाचा, फक्त देवमूर्तीत फरक. बाकी रामरगाडा सेम टु सेम. एक आचारी यायचा सैपाकाला पण पहाटे आंघोळ आटपून आचाऱ्याला पोटांत पेट्रोल (चहा वगैरे) घालून त्यांना बारीकसारीक मदत तत्परतेने करायची.

त्यांच्या संसारवेलीवर चार मोहोर आले. चि. उदय, शोभा, सुधीर व मीरा. ती कशी आहेत हे निराळं सांगायला हवं कां ?

मुखपत्रिका वाचताना उदयला फोन केला. त्याच्या अेका वाक्याने मी गलबलले "दुर्गाताई, माझ्या आईला अजून जगायची तीव्र इच्छा होती ग. तिला आठवण्याऱ्या खूप गोष्टी, गाणीं तिला इतरांना सांगायची होती." मी माझ्या सद्‌गुरुंना मनांतच म्हटलं, देवा, मला ८५ वर्षे पूर्ण झाली. वरती आलेल्या मला पुन्हा खाली ढकललंस तू त्यापेक्षा माझं उरलेलं आयु (व्यथेविरहीत मात्र) सुनीती वहिनीला सुपूर्द केलं असतंस तर फार गहजब झाला असता का रे ? अळीमिळी गुप्‌चिळी. असो आपण अज्ञातावर भाष्य करु नये हेच १०८ टक्के खरे आहे.

"या जगण्यावर या मरणावर शतदा प्रेम करावे." हीच माझी सतत माझ्या मनांत असलेल्या सुनीता वहिनीला आदरांजली.

**दुर्गा ज. वाघ, माहीम**

## The Memory of my Suniti Ajji

28th June 2014, Saturday 8.15 am. My cell phone at my residence in Maldives rings in a special tone indicating it's an international call. Seeing my wife Pranali as caller from Mumbai, I knew it had to be urgent. In a very calm and composed tone the news of demise of beloved Ajji was shared with me.

Suniti Ajji was 93 and lived a life seeing it all. My last surviving grandparent, the very thought of her not being around was hard to cope with. However seeing her health deteriorating over the last few months it was only a matter of time before the unthinkable. The only consolation being, that she passed away peacefully.

The thought of her being no more brought all the memories of childhood and recent time. These remained with me when I met her in person as well in recent times.

Coming from a large size family of Kinnerkar in Cancona in South Goa and moving to Karwar post marriage as wife of Shankar Telang and daughter-in-law of Rao Bahadur Ganpatrao Telany she had the most fantastic stories of culture, songs to share. Stories of pre Independence, Portuguese rule over Goa and life as it was. With her, gone are all those amazing stories and the massive links of families and cousins. It is amazing today that we struggle to remember beyond first cousins at times.

For me my most cherished memories with Ajji are when we used to visit Karwar in our summer and winter breaks. The unique way of her expressing her love and care has been picked up by my mom and my Meera pachi. A style which I see when my Ayee takes care of Riti (my niece). It's a style and memory of her and is here to stay in the family for now and will be cherished forever.

The value and importance of family caring and sacrifice all those were seen by me and my cousin from tender age. Strict when it came to religious ceremonies only make me realise that it was her dedication towards tradition and how much it mattered to her. She always gave freedom to us grand kids to be part of it or stay away if we liked. She and Appaja were a perfect pair of opposite behaviours and was undoubtedly the best part of the vacation. The love and care given by them is always going to be strong part of me and have shaped me and in my growing years.

Over the years in glory days of Karwar house she has been an amazing host to so many countless relatives and acquaintances. All who received the

same attention and care. In the recent years when she was mostly bed ridden these memories were always the part of her conversations that she narrated to us cousins. Quickly able to trace family tree and make distant relations seem so close. It was evident that family and relations defined her life and in these last few years being away from people and routine was missed by her.

It made me realise that in today's world where families are more nuclear in size than large joint, friends are filling up the void. Ajji always gave her best without any expectation. It was something in born and something that made her special. Not everyone at that age can handle it so gracefully. Apart from our health her care always was also towards asking for wellbeing of neighbours around and the success and progress of her kids and generations beyond.

As I recollect all my memories it dawns upon me of my inspiration from Ajji that "It's our level of expectation from others is what defines your happiness and relation, the lower you keep, the happy you are." She kept loving and giving unconditionally almost to be considered as a simpleton. In this I am sure many might have taken her for granted or taken advantage of this nature. But it's got her more people loving and praying for her which I guess kept her going for 93 years strong.

May her soul rest in peace and may I stay inspired by her always.

**Aditya Arun Ramani, Maldives**


**Shailesh Gaitonde**

**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

# निधन

| | | |
|---|---|---|
| इंदु गोविंद बोरकर | (कोडीबाग) | माहीम |
| कुसुम गोविंद बोरकर | (कोडीबाग) | माहीम |
| विद्या गजानन देसाई | (कडवाड) | पुणे |
| रवीन्द्र रंगराव देसाई | (व्हंडक्कल) | माहीम |
| यशवंत (विवेक) शेषगिरी देसाई | (व्हंडक्कल) | माहीम |
| प्रमोद दत्तात्रय देसाई | (कडवाड) | अमेरिका |
| भालचंद्र महारुद्र दुभाषी | (मखेरी) | पारले |
| जगत् अनंत डिगीकर | (डिगी) | पुणे |
| शीला पुंडलीक गायतोंडे | (कासरकोड) | हैदराबाद |
| मारुति भालचंद्र गायतोंडे | (हळगे) | मीरा रोड |
| स्नेहलता (शांतू) गोविंद कसबेकर | (खारगे) | फ्रेंच ब्रीज |
| विश्वनाथ वेंकटराव कंटक | (अंकोला) | बंगळूर |
| वैकुंठ (शिवानंद) दिगंबर कुलकर्णी | (अवर्सा) | मडगांव |
| रजनी (शालिनी) सुधाकर कुलकर्णी | (हळगे) | दादर |
| शांताराम सदाशिव कुलकर्णी | (हळगे) | गांवदेवी |
| लक्ष्मीबाई (सरस्वती) जगन्नाथ मुझुमदार | (अंकोला) | सांताक्रुज |
| महेश मंगेश मुझुमदार | (अंकोला) | मडगांव |
| महाबळेश्वर (विनू) वैकुंठ नाडकर्णी | (सांवरपै) | विरार |
| सतीश रामराव नाडकर्णी | (बसुणगे) | म्हापसा |
| तन्वी उदय पावशे | (बाड) | ठाकुर्ली |
| उमा (मीरा) शरच्चंद्र पालेकर | (बाड) | गिरगांव |
| प्रभाकर रामचंद्र पालेकर | (बिणगे) | वांद्रे |
| शरदकुमार रुद्रा पालेकर | (तोडूर) | पुणे |
| दिनकर यशवंत पिकळे | (अंकोला) | अंबरनाथ |
| गोपाळकृष्ण सावळाराम राजाध्यक्ष | (कारवार) | ठाणे |
| मंगेश गणपत साखरदांडे | (सुपा) | डोंबिवली |
| रवीन्द्र काशिनाथ तेलंग | (केरवडी) | दादर |
| गुलाब महेश्वर तेलंग | (बाड) | बेळगांव |
| अजित यशवंत वाघ | (सदाशिवगड) | पुणे |
| शुभदा किशोर वागळे | (माजाळी) | जोगेश्वरी |
| सीमा शिवानंद वागळे | (माजाळी) | दादर |
| विजय काशिनाथ वागळे | (माजाळी) | जोगेश्वरी |

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

## कै. पुटप्पा व कै. अरविंद नाडकर्णी पितापुत्रांच्या स्मरणार्थ अमृतमहोत्सव निधीसाठी एक कोटी रुपयांची विक्रमी देणगी

कै. पुटप्पा शिवराम नाडकर्णी व त्यांचे सुपुत्र कै. अरविंद नाडकर्णी या कर्त्या पितापुत्रांची ज्ञातिबांधवाना ओळख करुन देण्याची गरज नाही. 'दाता भवति वा न वा' या उक्तीला दोघेही अपवाद, जणू कर्णाचेच अवतार. उभयतांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कै. अरविंद यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती स्नेहलता यांनी संघाच्या अमृतमहोत्सव निधीसाठी एक कोटी रुपयांची देणगी दिलेली आहे. संघाला आतांपर्यत मिळालेल्या देणग्यांमध्ये ही देणगी विक्रमी आहे.

## श्रीमती सुमन वागळे यांजकडून संघाला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

पुणे येथील श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांचे पाच वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुमन वागळे या दरवर्षी पतीच्या पुण्यतिथी प्रसंगी संघाला पतीच्या स्मृतीप्रीत्यर्थ देणगी देतात. यंदाही त्यानी समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी पाठविलेली आहे. पतीच्या स्मरणार्थ त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम साडेतीन लाख रुपये एवढी आहे.

# संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री किशोर यांजकडून | १,००१ |
| २. | श्रीमती शैलजा देवीदास बोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त कन्या कुमारी सुनीता देवीदास बोरकर यांजकडून | ५,००० |
| ३. | श्री. बाळकृष्ण शिवकुमार नाडकर्णी यांजकडून | २५,००० |
| ४. | श्री. व्ही. टी. यार्दी ट्रस्टकडून (पैकी रु. ९३७ एज्यु. सोसायटीसाठी) | २,५०० |
| ५. | मुखपत्रिकेच्या कौतुकाप्रीत्यर्थ अनामिकेकडून | ५,००० |
| ६. | हितचिंतकाकडून | २,००१ |
| ७. | श्रीमती जयश्री कमलाकर नाईक यांजकडून | ५,००० |
| ८. | श्रीमती श्रीलक्ष्मी हत्तंगडी यांजकडून | ५,००० |
| ९. | हितचिंतकाकडून | १५,००० |
| १०. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. पराग यांजकडून | ५,००० |
| ११. | श्री. दीपक अंबिकाचरण बोरकर यांच्या स्मरणार्थ पत्नी ललिता यांजकडून | १०,००० |
| १२. | अनामिका कडून | १,१२१ |

| | | |
|---|---|---|
| १३. | पितरांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून | २,००० |
| १४. | अनामिकेकडून | १,१२१ |
| १५. | श्रीमती मनोरमा मंकीकर यांच्या स्मरणार्थ मैत्रीण श्रीमती आशा वालावलकर यांजकडून | ५,००० |
| १६. | श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांच्या ५ व्या पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती सुमन यांजकडून | ५०,००० |
| १७. | हितचिंतकाकडून | ३०,००० |
| १८. | दिवंगत कद्रेकर नाडकर्णी दायादांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पितृपक्षप्रसंगी हितचिंतकाकडून | २५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती इंदिरा मंगेश नाडकर्णी यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. प्रमोद यांजकडून | ५,००० |
| २. | हितचिंतकाकडून | १२,००० |
| ३. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. पराग यांजकडून | १५,००० |
| ४. | हितचिंतकाकडून | ३८,१४२ |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र अरुणकुमार यांजकडून | १०,००० |
| २. | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विमल यांजकडून | ५,००० |
| ३. | श्री. मंगेश रुद्रा पालेकर यांच्या ७ व्या पुण्यतिथीनिमित्त बहीण श्रीमती सुजाता सुब्राय वागळे यांजकडून | ५,००० |
| ४. | हितचिंतकाकडून | १५,००० |
| ५. | श्रीमती सुनंदा गोपीनाथ वाघ यांच्या जन्मशताब्दीप्रीत्यर्थ जाऊ श्रीमती सुलभा रामकृष्ण वाघ यांजकडून | ५,००० |
| ६. | श्रीमती इंदु व श्री. सच्चिदानंद अनंत वर्टी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५,००१ |
| ७. | हितचिंतकाकडून | ३०,००० |

## अमृत महोत्सव निधीसाठी

१. श्री. पुटप्पा शिवराम नाडकर्णी व श्री. अरविंद पु. नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ अनुक्रमे स्नुषा व पत्नी श्रीमती स्नेहलता अ. नाडकर्णी यांजकडून १,००,००,०००

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती उषा वासुदेव गायतोंडे यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. वासुदेव शांताराम गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| २. | दिवंगत नातेवाईक व मित्रांच्या स्मरणार्थ श्री. जगदीश पांडुरंग वाघ यांजकडून | १०,००१ |
| ३. | श्रीमती मंगला देवीदास मानगे यांच्या स्मरणार्थ पती श्री. देवीदास केशव मानगे यांजकडून | ५,००० |
| ४. | श्रीमती मालती व श्री. नीलकंठ भवानीशंकर धुमे व इतर पूर्वजांच्या स्मरणार्थ श्री. चंद्रशेखर नीलकंठ धुमे यांजकडून पितृपक्षानिमित्त | १,००० |

## मुंबई मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. पूर्णिमा दुर्गादास गायतोंडे | अंधेरी | १०,००० |


MIPL

**MANGSIDHESH INVESTMENT PVT. LTD.**


| | | |
|---|---|---|
| Financial Advisors | Equity Trading | Public |
| Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim |
| Postal Schemes | | |

**Corporate Office**

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.

Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80





हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.